नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०२/२०२५ (बुधवार) संध्याकाळ**

---

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई

पोलीस स्टेशन कुही :-दिनांक १८/०२/२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की उमरेड कडुन बोलोरो पिकअप एम एच ४० एके २९२० मध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी नाकाबंदी केली असता कुही फाटा येथे संशयीत बोलोरो पिकअप एम एच ४० एके २९२० **मिळुन आले वाहन** थांबवुन **वाहनाची** पाहणी केली असता त्यामध्ये ५ म्हशी बाधुंन निर्दयते कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आले .तसेच चालक **मनेश अरूण रेवतकर वय २६ वर्ष रा. बेटाडा ता. पवनी जि. भंडारा** हा मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातुन एक बोलोरो पिकअप एम एच ४० एके २९२० किंमती ५,००,०००/- रूपये. व ५ म्हशी किंमती १,५०,००० /- रूपयाचा एकुण किंमती ६,५०,०००/- रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

चालक आरोपी मनेश अरूण रेवतकर वय २६ वर्ष रा. बेटाडा ता. पवनी जि. भंडारा याच्या विरूध्द कलम ११(१) (ड) प्रा.छ. अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## गड मंदिर ,रामटेक येथ वनवा पेटुन लागली आग

## पोलीसांच्या तत्परतेने टळला मोठा अनर्थ

आज दिनांक १९/०२/२०१८ रोजी सायंकाळी पावणे सहा वाजण्याच्या सुमारास रामटेक येथील गड मंदिर येथे ,गड मंदिर मोठी पायरी च्या बाजूने वनवा पेटून आग लागली अशी माहीती पोलीसांना मिळताच प्रभारी अधिकारी रामटेक पोलीस स्टेशन श्री आसाराम शेटे यांनी सदर माहीती वरीष्ठांना कळवुन उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग, श्री रमेश बरकते यांच्या मार्गदर्शनात तात्काळ पोलीस स्टाफ घेवुन सदर ठिकाणी पोहचले. सदर ठिकाणी पोलीस

मित्रांना सुध्दा बोलावण्यात आले. मुख्याधिकारी नगरपरिषद रामटेक आणि वनविभाग यांना तात्काळ माहीती देण्यात आली. पोलीस मित्रांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले आणि आग विझवण्यात आली.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर